महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील १५३ गावांमध्ये ग्रामपंचायत स्तरावर शेती उत्पन्नसाठा ठेवण्यासाठी गोदाम बांधण्याबाबत

(१) ५८८९७ (२०-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील १५३ गावांमध्ये ग्रामपंचायत अंतर्गत शेतकऱ्यांना शेती उत्पन्नसाठा ठेवण्यासाठी गोदाम बांधण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०२-२०१९) : (१) शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या गोदामांचा प्रश्न सोडविण्यासाठी रु.१५३ कोटी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात मंजूर करण्याबाबतचे निवेदन दि.०९.०३.२०१६ च्या पत्रान्वये श्री.डी.मल्लीकार्जुन रेड्डी, वि.स.स. यांनी मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा यांना केलेली होती.

(२) पणन विभागाच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ कार्यरत आहे. परंतु, वखार महामंडळाला गोदाम बांधकाम करण्यासाठी पणन विभागामार्फत अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करुन दिली जात नाही. तसेच, ग्रामपंचायत स्तरावर गोदाम बांधकामाची योजना वखार महामंडळाकडून राबविली जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कांदा, टोमॅटो यासारखे नाशवंत पिकावर प्रकिया करून शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करण्याबाबत

(२) ९४३०२ (१८-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदा, टोमॅटो यासारखे नाशवंत पिकांवर प्रकिया करून शेतकऱ्यांना चांगला भाव मिळावा यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ञांची समिती गठीत करून त्यावर उपाययोजना करण्याबाबतचे आश्वासन मा.सहकार मंत्री यांनी दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी समिती गठीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच या समितीत तज्ञ म्हणून कोणाकोणाचा समावेश करण्यात येणार आहे ?

श्री. सुभाष देशमुख (१२-०२-२०१९) : (१) नाशवंत मालावर प्रक्रिया करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्यासाठी तज्ञाची समिती गठीत करण्यात येईल असे आश्वासन मा.मंत्री (पणन) यांनी दिले होते.

(२) नाशवंत शेतमालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य बाजार भाव मिळण्याच्या दृष्टीने शासनास उपाययोजना सुचविण्याकरिता समिती शासन निर्णय, दिनांक २४/४/२०१७ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) शासन निर्णय, दिनांक २४/४/२०१७ अन्वये कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे :-

१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य पणन मंडळ,पुणे	-	अध्यक्ष.
२) संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य,पुणे,	-	सदस्य
३) श्री.पाशाभाई पटेल, माजी विधानसभा सदस्य.	-	सदस्य
४) श्री.श्रीराम गाढवे, अध्यक्ष, अखिल भारतीय भाजीपाला उत्पादक संघ,पुणे,	-	सदस्य
५) श्री.विलास शिंदे, सह्याद्री ॲग्रो फार्मर प्राड्युसर कंपनी लि.नाशिक,	-	सदस्य
६) श्री.सोपान कांचन, अध्यक्ष, महाग्रेप्स, पुणे,	-	सदस्य
७) श्री.प्रभाकर चांदणे, अध्यक्ष, महाअनार, पुणे,	-	सदस्य
८) श्री.श्रीधर ठाकरे, अध्यक्ष, महाऑरेंज, नागपूर,	-	सदस्य
९) श्री.पंकज खंडेलवाल, आयएनआय फॉर्म्स प्रा.लि. अधेरी	-	सदस्य
१०) श्री.अंकुश पडवळे, मंगळवेढा, शेतकरी प्रतिनिधी.	-	सदस्य
११) सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे	-	सदस्य सचिव

राज्यात दिवाळी सणाच्या कालावधीत भाज्यांचे भाव वाढल्याबाबत

(३) ९५२९५ (०३-०१-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवाळी सणाच्या कालावधीत दैनंदिन गरजेच्या भाज्यांचे भाव कडाडल्याने ग्राहकांना चढ्या भावाने भाज्या खरेदी करावी लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदा ३५ ते ४० रुपये, टोमॅटो ४० रुपये तर पालकची भाजी २५ ते ३० रुपये चढ्या भावाने विकण्यात आल्याने, उक्त कालावधीत ग्राहकांची होणारी लूट थांबविण्यासाठी भाज्यांच्या दरावर नियंत्रण करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ग्राहकांच्या लूटीस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१२-०२-२०१९) : (१) व (२) हे अशंत: खरे आहे

राज्यात ऑक्टोबर २०१७ मध्ये कांद्याचे सरासरी दर २७.३६ प्रति किलो, टोमॅटो सरासरी दर १७.१५ प्रति किलो व पालक भाजी सरासरी दर १३.२८ असे होते. कांदा, टोमॅटो व पालक मागील वर्षाच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसून आले.

भाज्याची आवक व ग्राहकांची मागणी, यावर दर निश्चित होत असल्यामुळे राज्यात दिवाळी सणामध्ये ग्राहकांना चढया भावाने भाज्या खरेदी कराव्या लागत होत्या. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सुधारणा करुन भाजी व फळे बाजार समितीच्या बाहेर नियमन मुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे भाजी व फळे या शेती मालाचे बाजार समितीच्या बाहेर बाजार समितीकडून नियमनकेले जात नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील रमाबाई आवास योजनेअंतर्गत मान्यता देण्यात आलेल्या लाभार्थ्यांना अनुदानाचे लाभ देण्याबाबत

(४) ९९८२५ (१८-०१-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील रमाबाई आवास योजनेअंतर्गत सन २०१६-१७ पुर्वी मान्यता देण्यात आलेल्या लाभार्थ्यांना अनुदानापासून डावलण्यात येत असल्याची बाब दिनांक २८ जुलै, २०१७ वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दिनांक ७ जानेवारी, २०१७ शासन निर्णयान्वये रमाबाई आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदानाचे लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१०-०२-०२०१) : (१) हे खरे नाही.
(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. रआयो-२०१६/ प्र.क्र.५७८/बांधकामे, दिनांक ७ जोनवारी, २०१७ अन्वये रमाई आवास योजनेअंतर्गत नगरपालिका / नगरपरिषद क्षेत्रातील लाभार्थी अनुदानात रु. १.५० लक्ष वरुन रु. २.५० लक्ष अशी वाढ केलेली असल्याने वाढीव रक्कमेतील थकबाकीची प्रतिलाभार्थी रु. १.०० लक्ष प्रमाणे एकूण रक्कम रु. ३०.०० लक्ष सन २०१७-१८ या वर्षात योजनेतील पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील कृषी समृद्धी प्रकल्पातील समस्येबाबत

(५) १०१९२९ (०३-०१-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील कृषी समृद्धी प्रकल्पातील प्रकल्प लेखाधिकारी यांनी लाभार्थी शेतकऱ्यांच्या तांत्रिक त्रुटी काढून वेळेवर आर्थिक मदत न मिळू देणे, कार्यान्वयीन संस्थांचे हिशोब अयोग्य प्रकारे करून त्यांचे अग्रिम दाखवून त्यांना आर्थिक व मानसिकदृष्ट्या खच्चीकरण करणे तसेच शासनाची दिशाभूल करून प्रकल्प योग्यरित्या चालविण्यामध्ये अडथळा निर्माण केला आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास, मा.मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांचेकडे उक्त अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून कार्यवाही करणेबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१९) : (१), (२) व (३) कृषी समृध्दी प्रकल्पातील समस्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची तक्रार शासनास प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने प्रकल्प संचालक, समन्वयीत कृषि विकास प्रकल्प यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश शासनाने दिले होते. सदर प्रकरणी उपआयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून त्यांचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील दहेज नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रोजेक्टमधील बाधित शेतकऱ्यांच्या आर्थिक फसवणूकीबाबत

(६) १०२१७३ (१३-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील दहेज नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रोजेक्टमधील बाधित शेतकऱ्यांच्या आर्थिक फसवणूकीबाबत मा.महसूल मंत्री यांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१४-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

तथापि पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यातील पाईपलाईनमुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांच्या आर्थिक फसवणूकीबाबत मा. महसूल मंत्री यांना दि. ०५ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये निवेदन सादर केले आहे.

(२) पालघर जिल्हयातून दहेज-नागोठणे इथेन पाईपलाईन प्रकल्पाची पाईपलाईन शेतकऱ्यांच्या शेतातून गेल्यामुळे शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांची लोकप्रतिनिधी समवेत पालघर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शिष्ट मंडळाने भेट घेतली असता मा. मुख्यमंत्री महोदयांनी विभागीय आयुक्त, कोकण जिल्हाधिकारी, पालघर, सहसंचालक नगर रचना कोकण यांची समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने शासनास पाठविलेल्या चौकशी अहवालावर खालील निर्णय घेण्यात आलेला आहे :-

१) समितीने शिफारस केल्याप्रमाणे रुपये ५९८४०/- प्रती गुंठा या दरास संबधित शेतकरी व रिलायन्स कंपनी यांची सहमती असल्यास त्याचप्रमाणे खात्री करुन त्यानुसार कार्यवाही करावी.

२) संबधित शेतकऱ्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या मोबदल्याची रक्कम क्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या रकमेपेक्षा कमी असल्यास त्याचा वाढीव मोबदल्यासाठी विचार करण्यात यावा.

३) सदर वाढीव मोबदल्याच्या रकमेतून त्यांना यापुर्वी देण्यात आलेल्या रकमेतून त्यांना यापुर्वी देण्यात आलेली रक्कम वजा करुन फक्त फरकाची रक्कम त्यांना देण्यात यावी. ज्या शेतकऱ्यांना रुपये ५९८४०/- किंवा त्यापेक्षा जास्त दर दिला आहे त्याचा वाढीव मोबदला देण्यासाठी विचार करण्यात येऊ नये.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हयात वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी बसवनगर येथील जागेसह या प्रस्तावास मान्यता दिल्याबाबत

(७) १०३४९२ (१३-०७-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी मा. वस्त्रोद्योग मंत्री यांनी बसवनगर येथील जागेसह या प्रस्तावास स्वहितासाठी मान्यता देण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानूसार स्वत:च्या संस्थेचे हित साधणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०६-०२-२०१९) : (१) सोलापूर जिल्हयात वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी बसवनगर येथील जागेसह या प्रस्तावास स्वहितासाठी मान्यता देण्यात आले आहे हे खरे नाही. तथापि या विषयाच्या अनुषंगाने द इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी वर्तमानपत्रात दिनांक ९ ऑक्टोंबर, २०१७ रोजी बातमी प्रसिध्द झाली होती. त्यास अनुसरुन संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये खुलासा सादर करण्यात आला होता.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील सुमारे १० लाख शेतकऱ्यांची वैध-अवैध सावकारीतुन सुटका करण्याबाबत

(८) १०४४१३ (१३-०७-२०१८). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे १२ हजार २०८ परवानाधारक सावकारांची संख्या असून, त्यांच्याकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची संख्या सुमारे १० लाख आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध सावकारांच्या जोखडात अडकलेल्या कर्जदार शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, दुष्काळग्रस्त मराठवाड्यात अवैध सावकारीने अनेक निष्पाप शेतकऱ्यांचे बळी घेतले असून, उस्मानाबाद जिल्हयात अवैध सावकारीने गेल्या ५ वर्षात सुमारे १७ शेतकऱ्यांचे बळी घेतल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी सावकाराच्या जाचामुळे खचलेल्या अन पिचलेल्या विशेषत: विदर्भ-मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्याचा निर्णय सन २०१४ च्या अधिवेशनात घेऊन १७१ कोटीच्या पॅकेजची घोषणा केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, असे असतानाही शेतकऱ्यांच्या गळ्याभोवती असलेला सावकारी पास अद्यापही सुटलेला नसल्याने याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार वैध-अवैध सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सक्तीने सुटका करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. सुभाष देशमुख (२५-०१-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

राज्यात सन २०१५-१६ अखेर परवानाधारक सावकारांची संख्या १२ हजार २०८ होती व शेतकरी व बिगर शेतकरी कर्जदारांची संख्या १०,८६,२५६ इतकी होती. तसेच सन २०१७-१८ अखेर सदर संख्या अनुक्रमे १२,२२८ व ८,६४,४५५ इतकी आहे.

(२) नाही.

मराठवाडयामध्ये अवैध सावकारीमुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) विदर्भ व मराठवाडयातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासनाने दिनांक १०.०४.१५ रोजी निर्णय घेतला. त्यानुसार ४२६८७ कर्जदार शेतकऱ्यांना रु.६२.८७ कोटी रकमेची कर्जमाफी देण्यात आली आहे.

(५) अवैध सावकारीबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रार अर्जाबाबत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

जळगांव जिल्ह्यातील भडगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजीपाला मार्केट यार्डात शेतकऱ्यांकडून अडत वसुली केल्याबाबत

(९) १०४९४० (२३-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील भडगाव बाजार समितीत अडत वसुली बंदचा निर्णय होऊन एक वर्षाहून अधिक कालावधी उलटूनही भडगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजीपाला मार्केट यार्डात शेतकऱ्यांकडून सर्रास अडत वसुली केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तक्रार करुनही अडतदार जुमानत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तसेच दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१६-०८-२०१८) : (१) अशा प्रकारची कोणतीही तक्रार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव यांचेकडे प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील मातृसेवा संघातर्फे चालविण्यात येणाऱ्या अपंग मुलांच्या शाळेतील रिक्त पदांबाबत

(१०) १०५५२५ (१९-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील मातृसेवा संघ या सेवाभावी संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या स्नेहांगण या निवासी अपंग मुलांच्या शाळेत मुख्याध्यापक व स्वयंपाकींसह अन्य महत्वाची अनेक पदे मागील काही वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२४-०१-२०१९) : (१) होय.
(२) व (३) सदर शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी दिनांक १५.१२.२०१७ च्या पत्रान्वये ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

तसेच सदर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस विहित सरळसेवा भरती नियमांचे अधिन राहून पूर्वलक्षी प्रभावाने विशेष बाब म्हणून दि.१०.१०.२०१८ च्या शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

औरंगपूर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील युवा शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

(११) १०६०२३ (२३-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगपूर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील बाजीराव मार्तंड चिखले या युवा शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने कर्जमाफी योजना राबवूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेत त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०५-०१-२०१९) : (१) अंशतः खरे आहे,

कै. बाजीराव मार्तंड चिखले यांनी दि. १४.०१.२०१८ रोजी विषारी औषध सेवन करून आत्महत्या केली आहे. कै. चिखले हे भेंडाळी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. भेंडाळी, ता. निफाड या संस्थेचे सभासद नसल्याने त्यांचेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज नव्हते. त्यांचे वडील कै. मार्तंड मुरलीधर चिखले हे भेंडाळी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. भेंडाळी, ता. निफाड या संस्थेचे सभासद असून त्यांचेकडे दि. ३१.०७.२०१७ अखेर एकुण रु २.८८ लाख इतकी थकबाकी आहे.

कै. मार्तंड मुरलीधर चिखले यांचे दिनांक २६.१२.२००९ रोजी निधन झालेले असल्याने त्यांचे वारस श्री. मंगेश मार्तंड चिखले यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ च्या दि. ०९.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ओ. टी. एस. अंतर्गत रु.१.५० लाख माफ करण्याबाबतच्या यादीमध्ये समावेश केला आहे. तथापी श्री.मंगेश चिखले यांनी रू.१.५० लाखावरील रकमेचा भरणा केल्यानंतर त्यांना योजनेअंतर्गत रू.१.५० लाख रकमेचा लाभ देण्यात येईल.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील निफाड सहकारी साखर कारखाना बंद असल्याबाबत

(१२) १०६०२९ (२३-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील निफाड सहकारी साखर कारखाना बंद स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साखर कारखाना बंद असल्याने हजारो कामगार बेरोजगार झाले असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कारखाना पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२८-०१-२०१९) : (१) होय.
(२) सदर साखर कारखाना बंद असल्याने कामगार कारखान्यात कार्यरत नाहीत. शेतकऱ्यांचा ऊस अन्य कारखान्यामार्फत गाळप झालेला आहे.
(३) निफाड सहकारी साखर कारखाना सुरू करण्याबाबत मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१.०९.२०१६, दि.२७.०१.२०१७ व दि.९.०३.२०१८ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. शासनाने शासन निर्णय दि.०४.०९.२०१७ अन्वये मोडकळीस आलेल्या / अवसायनात निघालेल्या सहकारी साखर कारखान्याची मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करण्याऐवजी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ किंवा राज्य सरकारने लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन सदर संपादित मालमत्ता भाडेतत्वावर चालविण्यास देणेसंबंधी साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

बँकेने सदर कारखाना भाडेतत्वावर चालविण्यास देण्याबाबतची जाहिरात दिनांक १६.१०.२०१७ व दिनांक १३.०८.२०१८ रोजी दिलेली होती. दिनांक १३.०८.२०१८ रोजीच्या निवेदा प्रक्रीयेत ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. तथापि सदर ३ ही निविदाधारकांनी आजपावेतो अनामत रकमेचा भरणा केला नाही. सद्यस्थितीत कारखाना भाडेतत्वावर देण्याची कार्यवाही बँकेमार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

नायगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील गोदा युनियन सेवा सहकारी संस्थेस व्याज सवलत योजनेसह पीक कर्जाचे वाटप करण्याबाबत

(१३) १०६६४७ (२०-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील युनियन बँक ऑफ इंडियाच्या अंगीकृत कृषक संस्था असलेल्या गोदा युनियन सेवा सहकारी संस्थेस व्याज सवलत योजनेसह पीक कर्जाचे वाटप द.सा.द.शे. ७% दराने करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) : (१) होय खरे आहे.
(२) व (३) युनियन बँक ऑफ इंडिया नायगांव ता.सिन्नर जि.नाशिक या बँकेने सन २०१६-१७ वर्षासाठी मंजूर केलेली पीक कर्जासाठीची व्याज सवलत योजना बंद झाल्याच्या कारणावरून सदर कर्जासाठीचा व्याजदर वाढविला आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या Master Circular दिनांक १/७/२०१४ नुसार, राष्ट्रीयकृत बँकांनी प्राथमिक कृषी पुरवठा संस्थांना अल्प मुदती पीक कर्ज पुरवठा करताना नाबार्डकडून पुनर्वित्त मिळणाऱ्या रकमेएवढीच रक्कम बँकेच्या बेस रेटपेक्षा कमी दराने करता येईल. बँकेने स्वनिधीतून कर्ज पुरवठा केलेल्या रकमेस बेस रेटपेक्षा कमी व्याजदर लावता येणार नाही असे नमूद केले आहे. तसेच, सदर राष्ट्रीयकृत बँकांनी PACS/FSS/LAMPS यांना वितरीत केलेल्या पीक कर्जास व्याज परतावा लागू राहणार नाही, असे स्पष्टीकरण भारत सरकारने रिझर्व्ह बँकेस दिले असल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेने त्यांच्या दिनांक ९ फेब्रुवारी २०१७ च्या पत्रान्वये संबंधित संस्थेस कळविले आहे.

सदर बाब केंद्र शासनस्तरावरील असल्याने संबंधित संस्थेस सवलतीच्या व्याजदराने कर्ज पुरवठा करता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येत असलेल्या शिष्यवृत्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(१४) १०८०३७ (२०-०४-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येत असलेल्या शिष्यवृत्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी अतिरिक्त पोलीस महासंचालकांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या विशेष कृती पथकाने (एसआयटी) ७२ संस्थाविरुध्द गुन्हे दाखल करण्याबाबतचे आदेश सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांना दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात मात्र ७२ संस्थापैकी केवळ २२ संस्थाचालक व प्राचार्यांविरुध्द गुन्हे दाखल करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच ६८ दोषी संस्थाविरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या आणि वसूलपात्र रक्कम वसूल करण्याबाबत दिलेल्या सूचनेनुसार आयुक्त, समाजकल्याण यांनी किती व कोणकोणत्या संस्थाविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत व आतापर्यंत अपहारित रक्कमेपैकी किती रक्कम वसूल करण्यात आली आहे व अद्याप किती रक्कम वसूल करावयाची बाकी आहे व या वसुलीबाबतची सद्य:स्थिती काय आहे?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजकुमार बडोले (१२-१२-२०१८) : (१) अंशत: होय, सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येत असलेल्या शिष्यवृत्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी विशेष चौकशी पथकाने अंतिम अहवालात एकूण ७० संस्थाविरुध्द गुन्हे दाखल करण्याची शिफारस केलेली आहे.
(२) व (३) सदर ७० शैक्षणिक संस्थांपैकी ५ संस्थांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन, २३ संस्थांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. ४० संस्था न्यायालयात गेल्याने सदरील प्रकरणं न्यायप्रविष्ठ आहे. उर्वरीत २ शैक्षणिक संस्था हया आदिवासी विकास विभागाशी संबंधित आहेत.

विशेष चौकशी पथकाने नमूद केलेल्या दोषी संस्थांकडून आजतागायत रु.३.२१ कोटी रक्कम वसुलपात्र रक्कम वसूल करण्यात आली असून, रु.२४.७७ कोटी इतकी वसुलपात्र रक्कम वसूल करणे बाकी आहे. उर्वरीत रक्कमेची वसूली ही संबंधित संस्था न्यायालयात गेल्याने प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. ६८ संस्थांपैकी ज्या संस्था न्यायालयात गेल्या नाहीत, अशा संस्थांची वसुली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राजुरा व कोरपना (जि.चंद्रपुर) तालुक्यातील स्थानिकांना व प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

(१५) १०९२०९ (१७-०४-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा व कोरपना (जि.चंद्रपुर) तालुक्यातील उद्योगिक कंपन्यांमधे सुशिक्षित स्थानिक बेरोजगार युवकांना, प्रकल्पग्रस्तांना, आय.टी.आय प्रशिक्षीत बेरोजगारांना तसेच प्रकल्पग्रस्तांचे वारसांना नोकरीत सामावुन घेण्याबाबत शासन व कंपनीशी करार झालेला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कराराच्या अनुषंगाने स्थानिकांना व प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावुन घेण्यास दिरंगाई करून अनियमितता होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुशिक्षित स्थानिक बेरोजगार युवकांना, प्रकल्पग्रस्तांना, आय.टी.आय प्रशिक्षीत बेरोजगारांना तसेच प्रकल्पग्रस्तांचे वारसांना शासन निकषाप्रमाणे नोकरीत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१०-०१-२०१९) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

राजुरा व कोरपना (जि.चंद्रपुर) तालुक्यातील खालील मोठया उद्योगाकडून स्थानिक लोकांना E.L.P.-१ नुसार रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे :-

उद्योगाचे नांव	एकूण रोजगार	स्थानिक रोजगार	टक्केवारी
माणिकगड सिमेंट कं, युनिट १	५०६	४३०	८५%
माणिकगड सिमेंट कं, युनिट २	३१७	२६७	८४%
अल्ट्राटेक सिमेंट लि. अवारपूर	४५१	३८२	८४%
अंबुजा सिमेंट कं. उप्परवाही	२६७	२२७	८५%

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बंद असलेल्या मजूर संस्थांचे पुनरुज्जीवन करुन लाखो रुपयांचे कर्ज देणाऱ्या मुंबै बँकेच्या आर्थिक अहवालाबाबत

(१६) १०९६११ (१९-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बंद असलेल्या अनेक मजूर संस्थांचे (मुळात बनावट) पुनरुज्जीवन करुन त्यांना लाखो रुपयांची कर्जे देण्यात मुंबै बँकेचे तब्बल १८३ कोटी रुपये अडकल्याचा अहवाल आर्थिक गुन्हे विभागाला सादर होऊनही कारवाई झालेली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११-१२ मध्ये एकाच दिवशी ७४ मजुर संस्थांची नोंदणी झाली असून त्यातील अनेक संस्था त्यांनी दिलेल्या पत्यावर आढळून आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवाल सादर होऊनही संबंधितांवर शासनाने कोणतीही कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर प्रकरणी तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२५-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) व (५) लागू नाही.

चाकण (जि.पुणे) तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील बाधित शेतकऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत

(१७) १११०२५ (१८-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील बाधित शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित समस्यांबाबत दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योगमंत्री यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, बैठकीत उपस्थित केलेल्या एकूण ४३ तक्रारींबाबत सविस्तर चर्चा करून सविस्तर आढावा घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारींच्या चर्चेच्या अनुषंगाने प्रलंबित असणाऱ्या प्रकरणांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-१२-२०१८) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) उपस्थित केलेल्या ४३ तक्रारींपैकी २४ तक्रारींचा निपटारा करण्यात आला असून १९ तक्रारींबाबत महामंडळाकडून कार्यवाही सूरू आहे.

रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नियमबाह्य कर्जाची चौकशी करण्याबाबत

(१८) ११२२८३ (२३-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या राज्य क्षेत्रिय कार्यक्षेत्रास शासनाने व सहकार आयुक्त यांनी मंजुरी दिली नसल्याने रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेने कार्यक्षेत्राबाहेरील दिलेल्या कोट्यावधी रुपयांच्या नियमबाह्य कर्जाची चौकशी केल्याची मागणी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबींची दखल घेऊन रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेची सहकार आयुक्तांमार्फत चौकशी करुन बँकेवर तात्काळ प्रशासक नेमण्याची मागणीही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) : (१) अंशत: खरे आहे, मंजूर उपविधीनुसार बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यापुरते निर्धारीत केलेले आहे. शेती तसेच बिगरशेती कर्जवाटपातील नाबार्ड व रिजर्व्ह बँकेचे निर्बंध यामुळे बँकेची नफाक्षमता राखण्याकरता बँकेच्या उपविधीतील

तरतूदीनुसार सहभाग योजनेअंतर्गत जिल्ह्याबाहेरील प्रकल्पांना / कारखान्यांना कर्जपुरवठा केलेला आहे. परंतु बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असल्याने सदर कर्जपुरवठा नियमबाह्य असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) होय,

सखोल चौकशीच्या मागणी बाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेला कार्यक्षेत्र बदलाबाबत नोटीस देण्यात येवून, ज्ञापन दि.०९.०२.२०१८ अन्वये कार्यवाही करण्यात येवून जिल्हा कार्यक्षेत्र मंजूर करण्यात आले. निवेदनातील मुद्याबाबत तपासणी अधिकाऱ्यांच्या अहवालासंबंधी बँकेकडून मुद्देनिहाय खुलासा/अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. तपासणी अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरीक्षण) कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडून खुलासा/अभिप्राय प्राप्त करुन पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहांचे परिपोषण अनुदान बंद केल्याबाबत

(१९) ११२८४९ (१९-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहांचे परिपोषण अनुदान कागदपत्र पडताळणीच्या नावाखाली बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे अशा वसतीगृहात राहणाऱ्या राज्यातील सुमारे एक लाख विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणामुळे संपुर्ण राज्यातील वसतीगृहांना वेठीस धरण्यात येत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१५-०१-२०१९) : (१) राज्यात काही अनुदानित वसतीगृहे शासनाची मान्यता नसतानांही चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असल्याने अशा वसतीगृहाची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात येऊन या वसतीगृहांचे अनुदान तात्पुत्या स्वरूपात थांबविण्यात आले होते.

(२) नाही.

(३) नाही.

केवळ मुळ मान्यता नसलेल्या वसतीगृहांचे अनुदान तात्पुरत्या स्वरूपात थांबविण्यात आले होते.

(४) मुळ मान्यता आदेश नसलेल्या वसतीगृहांची तपासणी करण्या करीता दि. ०१.०९.२०१७ च्या आदेशान्वये राज्यमंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करण्यात आली होती.त्यानुसार राज्यमंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ८५० वसतीगृहांची सुनावणी घेऊन, त्यामध्ये अनुदानासाठी पात्र ठरलेल्या ७६१ वसतीगृहांचे अनुदानाचे आदेश आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे स्तरावर निर्गमित करण्यात आलेले असून उर्वरीत वसतीगृहांसंदर्भात कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्ववत नाही.

नांदेड जिल्हयासाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील कुटूंबाना हक्काचे घरकुल मिळण्याबाबत

(२०) ११४१७२ (२०-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयासाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील कुटूंबाना हक्काचे घरकुल मिळावे या दृष्टीकोनातून १ हजार ५०७ घरांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असुन प्रत्यक्षात मात्र ६५० घरांचे काम पूर्ण झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी एकूण उद्दिष्टांपैकी ५ टक्केच घरकुलांची कामे मार्गी लागली असून या वर्षी एकही घर पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घरकुल लाभार्थ्यांच्या यादीत आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या व्यक्तींची नावे असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील कुटूंबाना हक्काचे घरकुल मिळण्याबाबत तसेच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित दोषीविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले (०७-०२-२०१९) : (१) नाही, हे खरे नाही.

सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील व्यक्तींसाठी रमाई आवास योजना राबविण्यात येते. सदर रमाई आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नांदेड जिल्हयास सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षाच्या घरकूलांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

क्र	वर्ष	उद्दिष्ट	मंजूर घरकुले	पूर्ण घरकूले	प्रगती पथावरील घरकूले
१	२०१६-१७	३१५७	३१४८	९७१	२१७७
२	२०१७-१८	३०००	८३६	०	८३६
	एकूण	६१५७	३९८४	९७१	३०१३

(२) हे खरे नाही.

सन २०१६-१७ या वर्षात नांदेड जिल्हयाकरिता मंजूर केलेल्या उद्दिष्टांनुसार ३० टक्के घरकूलांची कामे पूर्ण झाली असून ८३६ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

(५) लागू नाही.

लातूर इंडस्ट्रीयल इस्टेट को.ऑप.सोसायटी मर्यादित, लातूर या संस्थेला ९० वर्षाच्या लीजवरील २७ एकर जमिनीच्या अनियमिततेबाबत.

(२१) ११४३५८ (२३-०४-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर इंडस्ट्रीयल इस्टेट को.ऑप.सोसायटी मर्यादित लातूर या संस्थेला उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी उद्योगासाठी ९० वर्षाच्या लीजवर २७ एकर जमिन दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेच्या मंजूर रेखांकनामध्ये असलेल्या भुखंड क्र.६९ ते ७५ आणि भुखंड क्र. ६६, ६७, ६८ च्या लगतच्या ३० फुटाच्या रस्त्यावर अतिक्रमण करून व रस्ता बंद करून टोलेजंग इमारती बांधल्या प्रकरणी कारवाई करण्याची मागणी मा.विकास आयुक्त, उद्योग संचालनालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय.

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२८-१२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

लातूर सहकारी औद्योगिक वसाहत संस्था मर्यादित, लातूर या संस्थेस उद्योग संचालनालयाने दिनांक ०४/०३/१९८२ रोजी सर्व्हे क्र. १८८ व १९० मधील ११२२३८७ स्क्वे. फु. (म्हणजेच २७ एकर) इतकी जागा संपादित करुन ९० वर्षाच्या भाडे करारावर दिलेली आहे. संस्थेच्या मुळ घटनेनूसार संस्थेचे वर्गीकरण “उत्पादन” या मुख्य वर्गात करण्यात आले आहे.

(२) हे, खरे नाही.

भुखंड क्र. ६९ ते ७५ आणि भुखंड क्र. ६६, ६७, ६८ च्या लगतच्या ३० फुटाच्या रस्त्यावर अतिक्रमण करुन व रस्ता बंद करुन टोलेजंग इमारती बांधल्या प्रकरणी कारवाई करण्याच्या मागणी संदर्भात विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांना अग्रेषित केलेले दि.२१/११/२०१७ रोजीचे पत्र उद्योग संचालनालय कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

साखरेचे दर बाजारात घसरल्याने उद्योग संकटात आल्याबाबत

(२२) ११४३६५ (२३-०४-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरेचे दर बाजारात घसरलेले असताना व आयात-निर्यातीबद्दलचे योग्य निर्णय वेळीच न घेतल्याने सदर उद्योग अडचणीत आला असून बँकांप्रमाणे साखर उद्योगासाठीही बेलआऊट पॅकेज देण्याची वेळ येणार असल्याची भीती या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करण्याची मागणी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री यांच्याकडे विविध सहकारी साखर कारखान्यांमार्फत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या साखर ३६०० रुपये क्विंटलवरुन २९०० रुपये क्विंटलपर्यंत दर खाली आले आहेत तसेच शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी २५०० रुपये एफआरपी जाहीर केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याच्या भावानुसार साखरेवरचा उत्पादन खर्च ३५०० रुपयापर्यंत येत असून, शेतकऱ्याला एफआरपीप्रमाणे किंमत देणे साखर उद्योगाला परवडणारं नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (३१-१२-२०१८) : (१) होय.

दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म. मुंबई यांनी मा.मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री यांच्याकडे साखर उद्योगासंबंधी ज्वलंत समस्यांबाबत राज्य व केंद्र शासनाकडून सहाय्य मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

(२) दि.१२.१२.२०१८ रोजी साखरेचे दर रु.२९००/- प्रति क्विंटल पेक्षा जास्त दराचे आहेत. केंद्र शासनाने २०१८-१९ गाळप हंगामासाठी रु. २७५०/- प्रती मे.टन १०% साखर उताऱ्यासाठी एफ.आर.पी. जाहीर केलेली आहे व पुढील १% साखर उताऱ्यासाठी रु.२७५.५० एफ.आर.पी. मध्ये वाढ होणार आहे.

(३) ऊसाचा दर देत असताना साखर पोत्यांवरील बँकांनी दिलेली उचल आणि उपपदार्थामधून मिळणारे उत्पन्न यामधून एफ.आर. पी. अदा करणे शक्य आहे.
(४) केंद्र शासनाने बफर स्टॉक, साखर निर्यात धोरण, साखरेचे दर व विक्रीबाबत घेतलेले निर्णय आणि इथेनॉल दरात वाढ करण्याबाबत घेतलेले निर्णय हे ऊस उत्पादकांना रास्त व किफायतशीर दर (एफ.आर.पी.) देण्यास उपयुक्त ठरणारे आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

दापोली (जि. रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहती व परिसरातील नागरिकांसाठी नवीन के.टी.वेअर बंधारा बांधण्याबाबत

(२३) ११५५५० (०४-०४-२०१८). श्री.संजय कदम (दापोली), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीमधील पाण्याची गरज भागविण्यासाठी जलस्त्रोत अपूरे असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन कोल्हापूर पध्दतीचे बंधारे मंजूर करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे निदर्शनास आले असून त्यासाठी जागांची निश्चिती करण्याचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दापोली येथे के.टी. वेअर बंधारा बांधल्यास तेथे मोठ्या प्रमाणावर पाण्याची साठवणूक होईल तसेच येथील औद्योगिक वसाहतींना व परिसरातील नागरिकांना लागणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याकरिता शासनाने दापोली तालुक्यासाठी नवीन केटी वेअर तातडीने मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-१२-२०१८) : (१) हे खरे नाही

दापोली (जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीसाठी पाण्याची गरज भागविण्यासाठी जलस्त्रोत अपुरे असल्याबाबत माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान कोणतीही तक्रार महामंडळास प्राप्त झालेली नाही. दापोली औद्योगिक वसाहतीमध्ये पाणी पुरवठा उपलब्ध आहे.
(२) हे खरे नाही.
(३) दापोली (जि. रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीकरिता पाणी पुरवठा करण्याची मागणी करण्यात आलेली नसल्यामुळे जलसंधारण विभागाकडून कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्याचे काम प्रस्तावित करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

दहिसर (मुंबई उपनगर) येथिल लोकशाहीर अण्णाभाऊ साहेब साठे, विकास महामंडळाच्या कार्यालयातून गैरव्यवहारासंबंधीच्या नस्त्या गहाळ केल्याबाबत

(२४) ११७११८ (३०-०७-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (मुंबई उपनगर) मधील हनुमान टेकडी भागातील कल्याणी केंद्र या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, विकास महामंडळाच्या कार्यालयातून सन २०१२-१५ या कालावधीत महामंडळाच्या ३४५ कोटी रुपयांच्या गैरव्यवहारासंबंधित नस्त्या कार्यालयाचे सील तोडून पळविण्यात आल्याप्रकरणी दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास दहिसर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीसांनी केलेल्या तपासाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींविरुध्द अद्यापपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच, घोटाळ्याशी संबंधित गहाळ झालेल्या नस्त्यांमधील तपशील पुन्हा मिळविण्याबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहींची सद्यःस्थिती काय आहे व असे प्रकार होऊ नये याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०६-०२-२०१९) : (१) व (२) सदर प्रकरणी दहिसर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून संबधितांना अटक करण्यात आलेली आहे.

(३) महामंडळातील गैरव्यवहारासंबधीच्या सर्व नस्त्या सदर घटनेपूर्वीच राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने तपासासाठी जप्त केलेल्या आहेत. तथापि, असे प्रकार पुन्हा होऊ नयेत याकरीता आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तळेगांव, पाणशिल पंचक्रोशी (जि. रायगड) येथील नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी करणेबाबत

(२५) ११७४६५ (२८-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगांव, पाणशिल पंचक्रोशी (जि.रायगड) येथील नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.सहकार मंत्री यांना दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) : (१) होय.
(२) २०१५-१६ या वर्षात घेतलेल्या पीक कर्जाची संपूर्ण परतफेड दि.३१.०७.२०१७ पर्यंत केली असल्यास तसेच सन २०१५-१६ या वर्षात घेतलेल्या पीक कर्जाची संपूर्ण परतफेड करुन सन २०१६-१७ या वर्षात घेतलेल्या पीक कर्जाची दि.३१.०७.२०१७ पर्यंत संपूर्ण परतफेड केली असल्यास अशा शेतकऱ्यांना सन २०१५-१६ या कालावधीसाठी घेतलेल्या पीक कर्जाच्या व्याजासह पुर्णत: परतफेड केलेल्या पीक कर्जाच्या २५% किंवा २५,००० जी रक्कम कमी असेल ती रक्कम शेतक-यांना देण्यात येईल, परंतु शेतकऱ्याने परतफेड केलेली किमान रक्कम रु.१५,००० पेक्षा कमी असल्यास अशी संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना शासनामार्फत प्रोत्साहनपर लाभ म्हणून देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यात खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याबाबत

(२६) ११७८५१ (२३-०७-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप कर्जासाठी सन २०१८ - १९ या आर्थिक वर्षात दोन हजार कोटींची गरज असतांना नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केवळ ५०० कोटींचेच कर्जवाटपाचे लक्ष ठेवलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांना अधिकच्या कर्जवाटपासाठी राज्य सहकारी बँकेकडे १५०० कोटींची मागणी केलेली आहे ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी कर्ज मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. सुभाष देशमुख (३१-१२-२०१८) : (१) होय.
नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आर्थिक दृष्ट्या अडचणीत असल्याने बँकेस जिल्हा समन्वय समिती मार्फत खरीप व रब्बी पिक कर्ज वाटपासाठी एकूण रूपये ५००.२५ कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.
(२) होय.
(३) नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांना पिक कर्ज उपलब्ध होणेसाठी सुलभ पिक कर्ज अभियान राबवून त्यानुषंगाने पिक कर्ज मेळावे आयोजित करून पात्र शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत पिक कर्ज वितरण करण्यात येत आहे. याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांचेमार्फत नियमित साप्ताहिक आढावा घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिखली (जि.बुलढाणा) येथे नाफेड अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या उडीदचे पैसे देण्याबाबत

(२७) ११९७८० (२६-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथे नाफेड अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या उडीदमधील सुमारे १९०० क्विंटल उडीद जिनिंग फेडरेशनकडे जमा असल्याने नाफेडने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान त्या मालाचे पैसे दिले नाही, हेही खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्याचे गेल्या पाच महिन्यापासून १ कोटी ३५ लाख रुपये घेणे बाकी असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२४-०१-२०१९) : (१) नाफेड अंतर्गत खरेदी केलेला २१५० क्विंटल उडीद FAQ प्रतीचा नसल्याने जिनींग व प्रेसिंग सहकारी संस्था म.चिखली या संस्थेकडे जमा आहे.

(२) होय.

(३) चिखली येथील खरेदी केंद्रावर खरेदी केलेला २१५० क्विंटल उडीद नाफेडच्या निकषात बसत नसल्यामुळे नाफेडने स्विकारला नाही. खरेदी केलेल्या मालाची साठवणूक गोदामात झाली नसल्याने तसेच भंडारगृह पावती (WHR) निर्गमित न झाल्याने नाफेडकडून निधी प्राप्त होणार नाही. शेतकऱ्यांचा माल परत करणे अथवा त्याचे चुकारे अदा करणे ही संबंधित सबएजन्ट संस्थेची जबाबदारी असून, याबाबत संबंधित संस्थेस कळविण्यात आले आहे. संस्थेने १८२ शेतकऱ्यांच्या १२७२ क्विंटल उडीदाची रुपये ६५.७१ लाख इतकी रक्कम शेतकऱ्यांना अदा केले असून, उर्वरित शेतकऱ्याच्या कागदपत्राची तपासणी करुन रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औद्योगिक क्षेत्रातील संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्याची नुकसानभरपाई शेतकऱ्यांना देण्याबाबत

(२८) १२०१२५ (२३-०७-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक क्षेत्रातील संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्याच्या धोरणानुसार (पुनर्वसन व पुनर्बहाली धोरण २००९) नुकसान भरपाई म्हणून १५ टक्के देण्यात येणारा परतावा शेतकऱ्यांनी विहित मुदतीत मागणी अर्ज न केल्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मुदतीत अर्ज न केल्याचे कारण देऊन परतावा नाकारणे योग्य नसल्याने त्यांना अपात्र न ठरवता १५ टक्के परतावा देण्यात यावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योग मंत्री यांचेकडे केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अपात्र ठरविलेल्या शेतकऱ्यांना १५ टक्के परतावा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-१२-२०१८) : (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) ही बाब महामंडळस्तरावर विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी टर्मिनल मार्केट उभारण्याबाबत

(२९) १२१२३९ (२८-०७-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी टर्मिनल मार्केट उभारण्याची घोषणा मा.सहकार, कृषी व पणन मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये केल्यानंतर खाजगी भागीदारातून टर्मिनल मार्केट उभारण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांचेकडून Business Model व प्रकल्प अहवाल मागविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी Business Model व प्रकल्प अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने टर्मिनल मार्केट उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०२-०२-२०१९) : (१) होय.

(२) होय.

(३) खाजगी भागीदारीतून टर्मिनल मार्केट उभारण्याचे प्रस्तावित असल्यामुळे सुधारित Business Model व प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास कळविले आहे. त्याप्रमाणे अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नेरपिंगळाई (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील लाभधारकांना घरकुलाचा लाभ मिळण्याबाबत

(३०) १२३४९२ (०२-०८-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरपिंगळाई (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील घरकुलांच्या यादीमध्ये लाभधारक अनुसुचीत जातीचे असल्याचे नमूद केल्यामुळे त्यांना घरकुलाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे सदर यादीत दुरुस्ती करुन घरकुलांचा लाभ पात्र लाभार्थींना मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.अ. यांना दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०६-०२-२०१९) : (१) हे खरे नाही,

सामाजिक आर्थिक जात सर्वेक्षण-२०११ प्राधान्यक्रम यादी प्रपत्र अ मध्ये मौजे नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील एकूण ११ लाभार्थ्यांपैकी अनुसूचित जाती या प्रवर्गाचे ९ लाभार्थी दर्शविण्यात आले आहेत व इतर प्रवर्गाचे २ लाभार्थी अनुसूचित जमाती या प्रवर्गात दर्शविण्यात आले आहेत.
(२) याबाबत ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत नेरपिंगळाई पंचायत समिती, मोर्शी, जि.अमरावती यांनी दि.२६/४/२०१८ अन्वये प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अमरावती यांना कळविले आहे.
(३) ग्रामपंचायत नेरपिंगळाई पंचायत समिती, मोर्शी मधील सदर एकूण ११ लाभार्थींची पंचायत समिती स्तरावर जातीच्या प्रमाणपत्रावरून पडताळणी केली असता सदर ९ लाभार्थी अनुसूचित जाती या प्रवर्गातील असल्याची खात्री झालेली आहे व उर्वरित २ लाभार्थी अनुसूचित जमाती या प्रवर्गातील आहे. सदर लाभार्थी यांचे नाव प्रपत्र ब यादीमध्ये समाविष्ट आहे. प्रपत्र ब यादीमध्ये बदल करावयाचे अधिकार संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई व राष्ट्रीय माहिती सूचना केंद्र, नवी दिल्ली यांना आहेत. तशी दुरूस्ती करण्याबाबत यापूर्वी झालेल्या बैठकांमध्ये संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण,

बेलापूर नवी मुंबई यांच्या निदर्शनास सदर बाब आणून देण्यात आली आहे. सदर लाभार्थ्यांना प्रपत्र ब यादीमध्ये दर्शविलेल्या प्रवर्गानुसार प्राधान्यक्रमानुसार प्राप्त होणाऱ्या लक्षांकाप्रमाणे घरकुलाचा लाभ देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

(३१) १२५०६१ (२६-०७-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक करुन व्यापारी माल घेऊन जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, सदरहू घटनांमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना फसविणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२५-०१-२०१९) : (१) व (२) होय
फळे नियमनमुक्त असल्यामुळे शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या आवाराबाहेर खाजगी व्यापाऱ्यांना विक्री केली आहे.
(३) श्री.संतोष श्रीराम शिरसाठ व इतर १८ शेतकऱ्यांनी श्री.राजकुमार परशुराम चुग या व्यापाऱ्याविरुद्ध फिर्याद दिलेली असुन, सदर फिर्यादित तक्रारदारासह इतर १८ द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची एकुण रक्कम रु.४१,९५,०००/- इतक्या रक्कमेची फसवणूक केलेली असल्याची नोंद आहे. त्याबाबत पिंपळगांव बसवंत, ता.निफाड येथील पोलीस स्टेशनला गुन्हा नं.५३/२०१८, डायरी नोंद न. १००६, दि.०५.०४.२०१८ अन्वये दाखल झालेला असुन, त्याबाबत पोलीस स्टेशनमार्फत तपासाचे कामकाज सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे सापे तर्फे तुडील (ता.महाड, जि.रायगड) येथील पाईप लाईनच्या दुरुस्तीची नुकसान भरपाई व रावढळ बंधाऱ्याची दुरुस्ती करणेबाबत

(३२) १२६२७० (२५-०७-२०१८). श्री.संजय कदम (दापोली) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सापे तर्फे तुडील (ता.महाड, जि.रायगड) येथील महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीतील रसायनयुक्त पाणी नागेश्वरी नदीत जात असल्याने नदीचे पाणी दूषित होत असून सदरहू

गावाला उक्त नदीतून पिण्याचा पाणी पुरवठा केला जात असल्याने पाणी पुरवठा करणारी पाईप लाईनमध्ये दुषित पाणी जात असल्याने स्थानिकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागेश्वरी नदीमध्ये सांडपाणी जावू नये म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सन २००२-०३ मध्ये रावढळ येथे बंधारा बांधण्यात आला मात्र सन-२००८ मध्ये महामंडळाकडून रोख रक्कम रुपये २०,३३,३७५/- अदा करुन व करारनामा करुन सदर बंधारा बांधकाम व देखभाल दुरुस्तीचे काम ग्रामपंचायत लोअर तुडील यांच्याकडे देण्यात आले परंतु ग्रामपंचायतीचा महसुल कमी असल्याने सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोअर तुडील ग्रामपंचायती समवेत अशा प्रकरचा करारनामा करताना त्याजवळील बाधित सापे तर्फे तुडील या गावाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना एमआयडीसीने सदरहू गावाची संमती घेतलेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) सदरहू गावाला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन दुरुस्त करुन झालेल्या नुकसानाची भरपाई एमआयडीसीने करुन उक्त बंधारादुरुस्तीही एमआयडीसी प्रशासनाने करावी अशा आशयाचे पत्र पंचायत समितीच्या सदस्यांनी दिनांक ९ जानेवारी,२०१७ रोजी दिले आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास शासनाने याची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१४-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) नागेश्वरी येथील बंधारा नादुरुस्त असल्याने त्याची दुरुस्ती महामंडळातर्फे करण्याची विनंती ग्रामपंचायत लोअर तुडील यांनी दि.०१/०४/२०१७ च्या पत्रान्वये केली होती. तथापि सदर बंधारा ग्रामपंचायत लोअर तुडील यांचे सोबत दिनांक ०३/०४/२०१७ रोजी करारनामा करुन एकूण रुपये २०२३३७५/- इतका महामंडळातर्फे निधी उपलब्ध करुन दिला होता तसेच सदर बंधाऱ्याची भविष्य काळात देखभाल व दुरुस्ती ग्रामपंचायतीने करण्याच्या अटीवर कायमस्वरुपी तुडील ग्रामपंचायतीस हस्तांतरित केल्यामुळे त्यांची दुरुस्ती महामंडळातर्फे करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यानुसार महामंडळच्या स्थानिक कार्यालयाने गटविकास अधिकारी यांना दिनांक १४/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुढील कार्यवाहीसाठी अवगत केले आहे.

(३) हे खरे नाही. सर्व ग्रामपंचायतीमार्फत रावढळ येथील कायमस्वरुपी बंधाऱ्याची नियमित देखभाल व दुरुस्ती बाबतची हमी गटविकास अधिकारी पंचायत समिती महाड यांचेमार्फत दिनांक २६/११/२००२ च्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे. यास्तव इतर ग्रामपंचायतीकडून नाहरकत घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) हे खरे आहे. बंधारा दुरुस्तीची बाब गटविकास अधिकारी पंचायत समिती महाड यांच्या अखत्यारित येत असल्यामुळे सदर विषयाबाबत आवश्यक कार्यवाही करणेकरिता महामंडळाने दिनांक १४/०१/२०१७ च्या पत्रान्वये गट विकास अधिकारी यांना कळविले आहे.

तसेच करारनाम्यानुसार सन २००८ पासून बंधाऱ्याची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित येत नसल्याने महामंडळाने बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याचा तसेच त्यामुळे झालेली कोणतीही नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्याच्या ७/१२ वरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची नोंद कमी करणेबाबत

(३३) १२६३३३ (०२-०८-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्याच्या ७/१२ वर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नोंदी झाल्यामुळे सदर शेतकऱ्याना २० वर्षापासुन कोणत्याही प्रकारचे शेती संलग्न योजनेचे फायदे मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्याच्या ७/१२ वरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची नोंद कमी करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्याच्या ७/१२ वरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची नोंद कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-१२-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) अंबरनाथ तालुक्यामध्ये मऔविम महामंडळाच्या अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक क्षेत्र टप्पा-२ साठी मौजे बोहोणोली, पाले, काकोळे, गोरपे, आंभे व शिरवली या सहा गावांच्या जमीन मऔवि अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ अन्वये दिनांक २८/०४/२००६ रोजी अधिसूचित झाल्या आहेत.सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी उल्हासनगर उप विभाग, उल्हासनगर यांचेमार्फत मऔवि अधिनियम १९६१ चे कलम ३२ (२) अन्वये खातेदारांना व्यक्तीगत नोटीसा दिनांक १०/०६/२००६ रोजी बजावण्यात आल्या आहेत. सदर गावापैकी मौजे बोहोणोली व मौजे पाले या गावांच्या अधिसूचित जमीनीसाठी भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून सदर जमीनीचा ताबा महामंडळाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. यामधील मौजे आंभे, गोरपे शिरवली व काकाळे या गावातील अधिसूचित ३७२.१०३० हे. आर जमीनीपैकी १८०.४५६० हे. आर. जमीनी कुशवली धरणाच्या लाभक्षेत्रात येत असल्याने सदर जमीनी वगळण्याबाबत निर्णय होणे प्रलंबित आहे. मौजे काकोळे, आंभे, गोरपे व शिरवली या गावासंदर्भात भूसंपादनास शेतकऱ्यांचा विरोध असल्याने भूसंपादन प्रक्रिया प्रलंबित आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील भाजीपाला व फळांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आधुनिक दर्जाची शीतगृहे उभारण्याबाबत

(३४) १२६५९९ (०४-१२-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शेतीमाल साठवण करण्यासाठी लागणारी शासकीय शीतगृहे यांची संख्या कमी असल्याने परिणामी तेथील शेतकऱ्यांना खाजगी शीतगृहांचा वापर करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांची आर्थिकस्थिती नाजूक असल्याने तसेच खाजगी शीतगृहे परवडत नसल्याने उक्त शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात भाजीपाला व फळे विकावी लागत असून उर्वरित मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चाौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समिती व पणन विभागाने शेतकऱ्यांना आधुनिक दर्जाचे शीतगृह उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०२-०२-२०१९) : (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी फळे व भाजीपाल्यासाठी प्रीकुलिंग, शीतगृहे, पॅक हाऊस इ. आधुनिक सुविधा असणाऱ्या केंद्राची तळसदे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे उभारणी केलेली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जयसिंगपूर (४७४० मे.टन) व इचलकरंजी (२६८० मे.टन) या ठिकाणी शेतीमाल साठवण्यासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची गोदामे आहेत.

(४) गोदामे व शीतगृहे उभारण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील १० ठिकाणच्या शासकीय जागांची मागणी वखार महामंडळाने संबंधितांकडे केलेली आहे. तसेच, कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीने श्री.शाहू मार्केट या मुख्य बाजार आवारात फळे, भाजीपाला, गुळ व ड्रायफ्रुटसाठी ३००० मे.टन क्षमतेचे आधुनिक शीतगृहे उभारण्यासाठी एस.पी.डी. कोल्ड स्टोरेज एल.एल.पी कोल्हापूर या कंपनीसोबत २९ वर्षाच्या लीज कराराने जागा भाड्याने दिलेली असून कंपनीकडून शीतगृहे बांधकामासाठीचा प्लॅन कोल्हापूर महानगरपालिकाकडे मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शिवराज मुद्रणालय, नागपूर येथील कामगारांना सेवाशर्ती लागू करण्याबाबत

(३५) १२६६२८ (१०-१२-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवराज मुद्रणालय नागपूर येथील शासन मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय उद्योग-४ मुंबई यांच्या सन १९९४ पासून आधिपत्याखालील आणि सन २०१४ मध्ये राष्ट्रीयकरण झालेल्या मुद्रणालयाच्या अखत्यारीत असलेल्या मुद्रणालयातील कामगारांना सेवाशर्ती लागू करण्याबाबत लिथो प्रेस कामगार युनियन यांनी लेखी निवेदनान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मागील ४ वर्षापासून कामगारांचे प्रश्न प्रलंबित असलेल्या शिवराज मुद्रणालय नागपूर येथील कामगारांना सेवाशर्ती लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२८-०१-२०१९) : (१) होय.

(२) होय.

(३) संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली मे.शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर येथील कामगारांना सेवा शर्ती लागू करण्याबाबत मा.मंत्री (उद्योग) यांचेकडे वेळोवेळी बैठका झाल्या असुन याबाबत तद्नंतर मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.११.२०१८ रोजी बैठक झाली असून त्यानुषंगाने पुढील योग्य तो निर्णय घेणेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ऊस तोडणी यंत्र खरेदी केलेल्या लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत

(३६) १२७६६४ (२४-१२-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऊस तोडणी यंत्र खरेदी केलेल्या ६८ लाभार्थ्यांचे अनुदान मागणी अर्ज साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे सादर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ६८ लाभार्थ्यांपैकी ४५ ऊस तोडणी यंत्रधारकांना अनुदान अदा करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित २३ लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२५-०१-२०१९) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या निधीमधून ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी अनुदान देण्याबाबतची योजना राबविण्यास शासन निर्णय दि.२१.०७.२०१७ अन्वये मंजूरी दिली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये प्राप्त रु.१२.०० कोटी तरतूदीमधून ४५ लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ऊस तोडणी यंत्रासाठीच्या अनुदान योजनेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीचा सन २०१७-१८ चा आर्थिक व भौतिक लक्षांक पुर्ण झालेला आहे. तसेच केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनानुसार ऊस तोडणी यंत्रास राष्ट्रीय कृषी योजनेंतर्गत अनुदान व्यवहार्य नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. सबब, उर्वरित २३ लाभार्थ्यांना रु.१३३४.८० लाख इतके अनुदान देण्यासाठीचे वाढीव प्रस्तावास अनुदान देणे अनुज्ञेय होणार नाही असे कृषी विभागाने अभिप्राय दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बंद असलेले साखर कारखाने भाडे तत्वावर सुरु करण्याबाबत

(३७) १२७७४५ (०४-१२-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सध्या बंद असलेल्या साखर कारखान्यांची विक्री न करता हे सर्व कारखाने भाडे तत्वावर सुरु करण्याबाबतचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात किती खासगी व सहकारी साखर कारखाने बंद आहेत व त्यापैकी माहे ऑक्टोबर, २०१८ अखेरपर्यंत किती व कोणते कारखाने भाडे तत्वावर चालवण्यास दिले व अद्याप किती कारखाने भाडेतत्वावर देण्याचे बाकी आहेत,
(३) असल्यास, उर्वरीत कारखाने भाडेतत्वावर देण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०२-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील आर्थीकदृष्टया आजारी असलेले सहकारी साखर कारखाने भाडेतत्वावर चालविण्यास देण्याबाबत शासन निर्णय दिनांक २३.११.२००५ अन्वये समिती गठीत करण्यात आली असून दि.२९.११.२००५ च्या शासन निर्णयानुसार कारखाना भाडेतत्वावर देण्याबाबतचे निकष ठरविण्यात आले आहेत. तद्नंतर शासन निर्णय दि.०६.१२.२०१६ अन्वये समितीची पुर्नरचना करण्यात आलेली आहे.

(२) राज्यात एकूण ५७ साखर कारखाने अवसायनात असून चालू हंगामात गाळप परवाना न घेतलेले सहकारी कारखाने १९ व खाजगी साखर कारखाने २१ आहेत.

ऑक्टोबर २०१८ अखेर ८ सहकारी साखर कारखाने भागीदारी / सहभागीदारी तत्वावर / भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात आले आहेत.

(३) कारखाना भाडेतत्वावर देण्याबाबतचा प्रस्ताव संबधीत सहकारी साखर कारखान्याकडून प्राप्त झाल्यानंतर शासन निकषाप्रमाणे कारखाना भाडेतत्वावर देण्याबाबत कार्यवाही केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आरमोरी (जि.गडचिरोली) येथील रेशीम विभागातील क्षेत्र सहायक यांच्या निलंबनाबाबत

(३८) १२७९९९ (०८-१२-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गडचिरोली) येथील श्री.देवराम पांडुरंग भगत, क्षेत्र सहायक रेशीम विभाग हे निर्दोष असतांनाही चुकीच्या पद्धतीने निलंबन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री.भगत यांची सक्तीची सेवानिवृत्ती घेण्यास रेशीम संचालनालयातील अधिकाऱ्यांनी भाग पाडून त्यांना निलंबन कालावधीतील वेतन अद्यापी देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.भगत यांचे निलंबन व सक्तीची सेवानिवृत्ती प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवालात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने श्री.भगत यांच्या कुटुंबियांना निवृत्तीवेतनाचे व इतर अनुषंगिक लाभ देण्याबाबत, त्यांचा मुलगा कुमार सुरज भगत यास शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत तसेच श्री.भगत यांना चुकीचे निलंबन केल्याप्रकरणी प्रशासनातील संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०२-२०१९) : (१) व (२) श्री.देवराव पांडूरंग भगत हे तांत्रिक सहायक, जिल्हा रेशीम कार्यालय, यवतमाळ येथे कार्यरत असताना त्यांनी नियंत्रण अधिकारी, प्रादेशिक नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांची लेखी अगर तोंडी परवानगी न घेता परस्पर वेतन प्रमाणपत्र, हमीपत्र व साक्षीदार म्हणून कर्मचाऱ्यांच्या बनावट सहया व शिक्याद्वारे स्टेट बँक ऑफ इंडीया, यवतमाळ येथून रू.२ लाख ७५ हजार कर्ज घेवून कार्यालयाची व बँकेचीही फसवणुक केली. याप्रकरणी म.ना.से. (शिस्त व अपिल)नियम, १९७९ मधील नियम ४ नुसार श्री.भगत, तांत्रिक सहायक यांना संचालक (रेशीम) यांच्या दिनांक ०३/०२/२००४ च्या आदेशानुसार निलंबीत करण्यात आले होते.

श्री.भगत यांच्या निलंबन प्रकरणी निलंबन काळ हा सर्व प्रकारच्या गणनेकरीता निलंबन काळ समजण्यात यावा असे दिनांक ०८/०८/२००८ च्या आदेशान्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये त्रुटी आढळल्याने सदर प्रकरणी श्री.भगत यांची कायमस्वरुपी थांबविण्यात आलेली एक वेतनवाढ मुक्त करून त्यांचा निलंबन काळ हा सर्व प्रकारच्या गणनेकरीता सेवाकाळ समजण्यात यावा असे आदेश ०६/०८/२०१८ रोजी निर्गमित केलेले आहेत.

मात्र, श्री.भगत, यांच्यावर, जिल्हा रेशीम कार्यालय, आरमोरी येथील गैरवर्तनाबाबत त्यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशीच्या अन्य प्रकरणी त्यांच्यावर ठेवण्यात आलेले पाच दोषारोप विभागीय चौकशीअंती सिध्द झाल्याने म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील सर्व प्रक्रियेचा अवलंब करुन त्यांना दिनांक ३१/०८/२०१७ रोजी सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे.

श्री.भगत यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी झाल्यानंतर त्यांच्या निलंबन काळातील वेतन अदा करणेबाबतची विवरणपत्रे वेतन पडताळणी पथक यांनी दि.२.२.२०१९ रोजी पडताळणी करून दिली आहेत. याबाबतचे देयक कोषागाराकडे सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) श्री.भगत यांच्या जिल्हा रेशीम कार्यालय आरमोरी येथील कार्यकाळातील गैरवर्तनाबाबत करण्यात आलेल्या विभागीय चौकशीत त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप विभागीय चौकशीअंती सिध्द झाल्याने विभागीय चौकशी अंतर्गत सर्व प्रक्रियेचा अवलंब करुन त्यांना दिनांक ३१/०८/२०१७ रोजी सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१/०९/२०१७ नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांनाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय आहे. श्री.भगत हे सेवानिवृत्तीनंतर मयत झाले असल्यामूळे त्यांचे कुटुंबियातील सदस्य अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्तीसाठी पात्र ठरत नाहीत. त्यानुसार श्री.भगत यांच्या पत्नी श्रीमती शिला देवराव भगत यांना दिनांक ०१/१२/२०१८ रोजी कळविले आहे.

बाजार समित्यामधील शेतमाल विक्री व्यवस्थेमध्ये पारदर्शीपणा आणण्यासाठी ई-नाम पद्धत राबविण्याकरीता निधी मिळण्याबाबत

(३९) १२८३८७ (०४-१२-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाजार समित्यामधील शेतमाल विक्रीव्यवस्थेमध्ये पारदर्शीपणा आणण्यासाठी राज्य शासनाने १४५ बाजार समित्यांमध्ये ई-नाम पद्धत राबविण्याचा निर्णय माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेच्या मान्यतेनंतर ६ महिने उलटल्यानंतरही अद्याप राज्य शासनाकडून निधी मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ई-नाम योजनेला निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२५-०१-२०१९) :
(१) शासनाने राज्यातील १४५ मोठया बाजार समित्या राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नामच्या) पोर्टलवर जोडण्याबाबतच्या प्रस्तावास दि.०६.०७.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.
(२), (३) व (४) राज्यातील १४५ मोठ्या बाजार समित्यांमध्ये ई-नाम पद्धतीची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक असलेल्या निधीची तरतूद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीमधील केन केमिकल्स कंपनीला लागलेल्या आगीबाबत

(४०) १२८५११ (०४-१२-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीमधील केन केमिकल्स या रासायनिक कंपनीत दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागल्याने लाखोंचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आगीची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार जखमींना मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (१९-१२-२०१८) : (१) सदरची आग ही ८ ऑगस्ट, २०१८ रोजी लागलेली नसून दिनांक ०८ सप्टेबर, रोजी लागलेली आहे.
(२), (३) व (४) विद्युतसंच मांडणीची योग्य निगा, देखभाल व दुरुस्ती न केल्यामुळे सदर दुर्घटना घडलेली आहे. सदर दुघर्टनेमध्ये कोणीही मृत अथवा जखमी झालेले नाही.

हिमायतनगर (ता.जि.नांदेड) येथील अपंग विधवा परित्यक्त्या, घटस्फोटीत महिला यांना संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेअंतर्गत मानधन मिळण्याबाबत

(४१) १२८८८१ (०४-१२-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (ता.जि.नांदेड) येथील नागरिकांना संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजने अंतर्गत अपंग, विधवा व परित्यक्त्या तसेच घटस्फोटीत महिला यांना शासनाच्या वतीने देण्यात येणारे मानधन वेळेवर मिळत नसल्याने शेकडो महिलांना मानधनासाठी तहसील कार्यालयाबाहेर दिवसभर ताटकळत बसावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक तालुक्यातील निराधारांच्या बँक खात्यातच मानधन जमा करण्यात येत असून हिमायतनगर तालुक्यातील निराधार लाभार्थ्यांना मानधनासाठी बायोमॅट्रीक मशीनद्वारे मानधन घ्यावे लागत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (११-०२-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांनी एडीएम ॲग्रो कंपनीस थेट विक्री केलेल्या सोयाबीनचे अनुदान मिळण्याबाबत

(४२) १२९९०४ (०४-१२-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयासह इतर जिल्हयातील शेतकऱ्यांनी खरीप सन २०१६-१७ मध्ये शेतातील उत्पादित सोयाबीन थेट ADM अग्रो इंडस्ट्रीज लातूर या कंपनीस माहे आक्टोंबर ते डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादम्यान विक्री केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयान्वये प्रति क्विंटल २०० रुपये अनुदानास पात्र असून सदरचा प्रस्ताव कंपनीने जिल्हा उपनिबंधक, लातूर यांच्याकडे सादर केला असतांनाही शेतकरी अनुदानापासून वंचित राहिल्यामुळे उक्त शेतकऱ्यांना त्वरित अनुदान देण्याची मागणी लातूर ग्रामीण लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय
(४) असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सदर शेतकऱ्यांना मागणीच्या अनुषंगाने अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२४-०१-२०१९) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) शासन निर्णय, दिनांक ०८/०८/२०१७ अन्वये खाजगी बाजार व थेट पणन परवानाधारकांना सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यानुषंगाने ADM ॲग्रो इंडस्ट्रीज, लातूर या संस्थेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनेत उच्च शिक्षणासाठी उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत

(४३) १३००६० (०४-१२-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा २० लाख रुपये ठेवण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच योजनेसाठी अनुसुचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा सहा लाख तर वि.जा.भ.ज., ई.मा.व, वि.मा.व. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी आठ लाख उत्पन्न मर्यादा केल्यामुळे शासनाने विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परदेशी शिष्यवृत्तीसाठी सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी २० लाख उत्पन्न मर्यादा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२८-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही. त्या-त्या प्रवर्गासाठी संबंधित विभागामार्फत परदेश शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा सहा लाख तर

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, वि.मा.प्र. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी आठ लाख उत्पन्न मर्यादा ठेवण्यात आलेली असली तरी त्यानुसारच त्या-त्या विभागामार्फत योजनेचे निकष, अटी-शर्ती, विद्यार्थी निवड संख्या व योजनेची नियमावली विहीत करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि.पुणे) तालुक्यातील आम आदमी विमा योजनेतील लाभार्थी लाभापासून वंचित असल्याबाबत

(४४) १३०२१६ (०४-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील भूमिहीन लोकांसाठी केंद्र शासनाच्या धोरणानुसार राज्यात २००७ पासून आम आदमी विमा योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड (जि.पुणे) तालुक्यातील दाखल प्रकरणांमधील अनेक प्रकरणे सन २०१३ पासून अद्याप प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूमिहीन शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर सदर व्यक्तींच्या घरातील व्यक्तींना मिळणारा लाभ आजतागायत न मिळण्याची कारणे काय आहेत तसेच विलंब करण्यास कारणीभूत असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (११-०२-२०१९) : (१) होय.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी खेड तालुक्यामध्ये सन २००७ ते मार्च २०१८ अखेर एकूण १३४ प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत. त्यापैकी ४९ प्रकरणे मंजूर, १९ प्रकरणे नामंजूर व उर्वरीत ६६ प्रकरणे LIC आयडी मधील नावामध्ये तफावत असल्याने प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याच्या दृष्टीने भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी पाणी पुरवठा योजनांचा समावेश छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत करण्याबाबत

(४५) १३११६६ (०४-१२-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ठिकपूर्ली, तळाशी (ता.राधानगरी), मडिलगे बु, गंगापूर (ता.भुदरगड) व सोनाळी (ता.कागल) येथील सहकारी पाणी पुरवठा योजनांचा समावेश छत्रपती

शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री व प्रधान सचिव, सहकार यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०१८ च्या लेखी निवेदनाद्वारे केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सहकारी पाणीपुरवठा संस्थांचा समावेश कर्जमाफी योजनेमध्ये करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०२-२०१९) : (१) होय.

(२) व (३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ मध्ये योजनेच्या लाभासाठी शेतकऱ्यांच्या अल्प व मध्यम मुदत कर्जाचा समावेश करण्यात आलेला असून यात दिर्घ मुदत कर्जाचा समावेश नाही. सहकारी पाणी पुरवठा संस्थांची कर्जे ही दिर्घ मुदत कर्जामध्ये येत असल्याने त्यांचा समावेश कर्जमाफी योजनेमध्ये करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हयातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

(४६) १३१३०३ (०४-१२-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर व अमरावती जिहयात ऑनलाईन नोंदणी करुनसुध्दा शासनाने शेतकऱ्यांची तूर खरेदी केली नसल्याने तूर उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल एक हजार रुपये अनुदान देण्याची शासनाकडून घोषणा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ३ महिन्यांचा कालावधी होऊन सुध्दा सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय ?

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर व अमरावती जिल्हयातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम त्वरीत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२४-०१-२०१९) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) हंगाम २०१७-२०१८ मध्ये तूर उत्पादक शेतकऱ्यांनी NeML पोर्टलवर नोंदणी केली होती. तथापि, त्यांचा शेतमाल खरेदी झाला नाही. अशा तूर उत्पादक शेतकऱ्यांना रुपये १०००/- प्रति क्विंटल आणि २ हेक्टर प्रति शेतकरी या प्रमाणात शासन निर्णय दिनांक १९/६/२०१८ अन्वये अनुदान मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडून शेतकऱ्यांची कागदपत्रांची छाननी करुन नोव्हेंबर, २०१८ मध्ये अनुदान वाटप करण्यात आले आहे.

याअंतर्गत सोलापूर जिल्हयातील पात्र १ शेतकऱ्याला रुपये ८०००/- व अमरावती जिल्हयातील २१०५६ शेतकऱ्यांना रुपये २३.५९ कोटी अनुदान वितरित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील गावांच्या विकासासाठी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत मिळालेल्या निधीतून खर्च करण्याबाबत

(४७) १३१५८३ (०४-१२-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ६०६ प्रकल्पग्रस्त गावांच्या विकासासाठी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत मिळालेल्या निधीतून ६६ टक्के निधी खर्च करण्यात येईल, असे निर्देश मा.केंद्रीय गृहराज्यमंत्री यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या आढावा बैठकीत दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्देशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. सुभाष देसाई (०६-०२-२०१९) : (१) व (२) जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या स्थापनेनंतर यापूर्वीचा महाराष्ट्र खनिज विकास निधी अधिनियम, २००१ निरसित करण्यात आला आहे. दि.१.९.२०१६ नुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेमधील प्रत्यक्ष खानबाधित क्षेत्रामध्ये एकूण निधीच्या किमान २/३ निधी खर्च करण्यात यावा व उर्वरित कमाल १/३ निधी अप्रत्यक्ष खान बाधित क्षेत्रात खर्च करण्यात यावा. अशी तरतूद करण्यात करण्यात आलेली आहे.

शासनपत्र दि.१७.४.२०१८ अन्वये खनिज विकास निधी अंतर्गत मंजूर प्रकल्प/विकास कामे जिल्हा खनिज प्रतिष्ठान मार्फत उपलब्ध निधीतून पुर्ण करण्याचे निर्देश सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना दिलेले आहेत.

नोव्हेंबर २०१८ अखेर सदर योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील रु.२०३.३५ कोटी अंदाजित खर्चाच्या कामांना मान्यता देण्यात आली व त्यासाठी रु.३३.३० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोईसर चिल्हेरफाटा (जि.पालघर) रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

(४८) १३२०२५ (०४-१२-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील बोईसर-चिल्हेरफाटा या रस्त्याच्या कामाची मुदत दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी संपली असूनही रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याने पालघर जिल्हयातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत अहवालात काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर महामार्गाच्या दुरुस्तीच्या कामात विलंब करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. सुभाष देसाई (१९-१२-२०१८) : (१) हे अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) महामंडळाच्या अखत्यारित येत असलेल्या चिल्हार बोईसर रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाची मुदत दिनांक २४/०८/२०१८ पर्यंत होती. सदरहू काम प्रगतीपथावर असून या पावसाळयात जुन्या रस्त्यावर पडलेले खड्डे मुरुम व खडीने दुरुस्त करण्याचे काम वेळोवेळी करण्यात आलेले असून पावसाळयानंतर सदरहू खडयांचे खडी व डांबरीने मजबुतीकरण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावरील वाहतूक ही निरंतर व विना अडथळा सुरळीत चालू आहे.

राज्यातील अल्प भूधारक शेतकऱ्यांची खावटी कर्जे माफ करण्याबाबत

(४९) १३२९३० (०४-१२-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमधून वगळण्यात आलेल्या अल्प भूधारक शेतकऱ्यांची खावटी कर्जे माफ करण्याचा निर्णय कर्जमाफीसबंधी नेमलेल्या उपसमितीने माहे ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अमलबाजवणी शासनाने केली आहे काय, तद्नुसार सदरहू निर्णयाची सर्वसाधारण रुपरेखा काय आहे,

(३) असल्यास, सदरहू निर्णयानुसार राज्यातील किती शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१२-०२-२०१९) : (१) अंशत: खरे आहे,

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या अंमलबजावणीसाठी गठीत मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि. ०३ ऑक्टोंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत शेतकऱ्यांची खावटी कर्जे माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(२) उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १५ जानेवारी, २०१९ च्या मंत्रीमंडळ बैठकीत सदर प्रस्ताव मांडण्यात आला असून मा.मंत्रीमंडळाने त्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सदर कर्जमाफीचा लाभ सुमारे ११३९० खातेदारांना होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील लाभार्थ्यांना संजय गांधी योजनेचे लाभ मिळण्याबाबत

(५०) १३३३१३ (०४-१२-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील तहसिलदार कार्यालयाच्या ढिसाळपणामुळे निराधाराच्या हितासाठी सुरु असलेली संजय गांधी योजनेकरीता लाभार्थी उपलब्ध होत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या लाभाकरिता आवश्यक असलेल्या उत्पन्नाचा दाखला मिळण्याकरिता अनेक अडचणी येत असल्याने लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या योजनेचा लाभ तातडीने देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (११-०२-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.